# काका-तात्या स्मृतिप्रीत्यर्थ स्पर्धेत कै. बाळासाहेब वाघ यांचे योगदान : डॉ. नांदुरकर

■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २ : कर्मवीर काकासाहेब वाघ व सहकारमहर्षी माधवराव तथा तात्यासाहेब बोरस्ते अर्थात काका- तात्या यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्पर्धा सुरू करणे व पुढे सुरू ठेवणे यात (कै.) बाळासाहेब (भाऊ) वाघ यांचे मोलाचे योगदान आहे. मुला व मुलींचा आत्मविश्वास वाढावा, त्यांनी मोठे व्हावे, या उद्देशाने ४१ वर्षांपासून ही स्पर्धा आदर्शवत सुरू आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले.

पद्मश्री देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ (गुरू) व त्यांचे शिष्य कै. सहकार महर्षी माधवराव तथा तात्यासाहेब बोरस्ते व काकुशेठ उदेशी यांच्या स्मृतीनिमित्ताने ४१ व्या गुरू-शिष्य स्मृतिमाह स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवारी (ता.२) सकाळी साडेदहा वाजता उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थान मुक्तांगणचे चिटणीस प्रा. शि. क. नाठे यांनी भूषविले. याप्रसंगी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, समन्वयक डॉ. व्ही एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, डॉ. एच. व्ही देशमुख, प्रा. एन. जी. देवशेटे, डॉ. एन. एस. पाचपोर, प्रा. व्ही. एस. संधान, प्रा. कमलेश जाधव उपस्थित होते. गुरू-शिष्य' स्मृतिमाह स्पर्धा ही गुणवंतांनी गुणवंतांसाठी अव्याहत चालविलेली स्पर्धा होय. आजच्या मोबाईलच्या माणसे तोडण्याच्या जगात या स्पर्धा माणसे जोडण्याचे काम करत असल्याची भावना प्राचार्य भूषण कर्डिले यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक समन्वयक डॉ. व्ही एम. सेवलीकर यांनी केले. उद्घाटनानंतर दोन गटात रांगोळी व चित्रकला स्पर्धा झाली. शहर व ग्रामीण विभागात पहिल्या गट- ५ वी ते ७ वी वयोगटातील विद्यार्थी तर दुसऱ्या गट ८ वी ते १० वी वयोगटातील ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा. शिंदे यांनी सूत्रसंचालन तर प्रा. एन. जी. देवशेटे यांनी आभार मानले.

Sakal 03-08-2024